MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात

**गेवराई, चकलांबा, तलवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीत पोलिसांच्या डोळ्यांदेखत अवैध वाळू उपसा जोरात. चकलांबा गेवराई तलवाडा पोलीस कर्मचारी कोण आहेत. कोण हप्ते घेणारे ते पोलीस कर्मचारी वाचा नाव मोबाईल नबरसह वाचा पुढील अंकात.....!**

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२८३ | शनिवार दि.०६ जुलै २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -283 | SATURDAY DT. 06 JULY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# गेवराई,माजलगाव वाळू माफियांचे कनेक्शन डीवायएसपी नीरज राजगुरू तहसीलदार संदीप खोमणे वाळू माफियांचे पाठीराखे?

## आ. लक्ष्मण पवारांच्या गेवराई मतदार संघात माजलगावचा वाळूमाफिया सक्रिय. गेवराई माजवगावात धागेदोरे डीवायएसपी नीरज राजगुरू तहसीलदार संदीप खोमणेना ही माहिती आहे?

- गोदामायची चाळणी करणारा वाळू तस्कर कांबळे कोण?
- बोरगाव थडी, गंगावाडी,राजापूर, काटोडा, रामपुरी, या ठिकाणी वाळू माफियांचे अड्डे रात्री बे रात्री हायवा सुसाट प्रशासनाच्या आशीर्वादाने पळू लागल्या
- नूतन जिल्हाधिकारी पाठक साहेब यांच्यापुढे वाळू माफीयाचे यांचे मोठे आव्हान.
- लोकप्रतिनिधी आ. लक्ष्मण पवार शांत का? वाळू माफिया विरोधात आंदोलन करणारे आ.लक्ष्मण पवार अवैध वाळू चोरीप्रकरणी अधिवेशनात विषय मांडतील का?

- आ.लक्ष्मण पवार यांच्या हस्तक्षेपामुळे तहसीलदार खोमणे व डीवायाएसपी राजगुरू गप्प कारवाई शून्य?
- माजलगावचा कांबळे नावाचा वाळू माफिया आ.लक्ष्मण पवारांचे कार्यकर्ते वाळू माफिया च्या यादीत तर आ. पवारांच्या कार्यकर्त्यांसोबत माजलगावच्या वाळू माफियाचे कलेक्शन गेवराईतील माफियांचे धागेदोरे असल्याचे चर्चा?

**अवैध वाळू उपसा**

माजलगावचा वाळू माफिया आ.लक्ष्मण पवारांच्या मतदारसंघात येवून करतोय अवैध वाळू उपसा!
मंडळ अधिकारी बाबा बडे यांचा नंबर लवकरच; कारवाईची टांगती तलवार?
तलवाडा चकलांबा गेवराईचे पोलीस कर्मचारी घेतात मोठ्या रकमेचा आकडा हप्त्याच्या स्वरूपात अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचतात नोटांचे बंडल?










### माजलगाव चा वाळू माफिया..?

काठोडा राजापूर या ठिकाणाहून गेल्या अनेक दिवसापासून माजलगावचा वाळू माफिया पोलीस प्रशासन व महसूल प्रशासनाला हाताशी धरून सर्रास गोदावरीची लूट करत असताना त्याच्या विरोधात गोदाकडच्या नागरिकात तीव्र संताप व्यक्त तर माजलगाव वरून हायवा घेऊन या ठिकाणी तो जेसीबीच्या साहाय्याने सर्रास वाळू उपसा करत व साठे व वाळू वाहतूक करत असल्यामुळे नागरिकांना त्रास होत असताना याकडे संबंधित प्रशासन दुर्लक्ष करत असल्यामुळे हा सर्व प्रकार सुरू असल्याची चर्चा नागरिकात होत आहे त्यामुळे हा वाळू माफिया कोण..? पोलीस प्रशासनाचा का महसूलचा जावई अशी तिखट प्रतिक्रिया नागरिकात होत आहे .

### लोकेशन साठी रोजंदारीवर मुले...

वाळू तस्कर कांबळे याची चर्चा गोदाकाट गावात चांगलीच चर्चा असून काठोडा रामपुरी राक्षस भवन अशा अनेक ठिकाणाहून रोज हजारो ब्रास वाळू माजलगाव च्या दिशेने सुसाट हयवा पळत असून त्यांनी जागोजागी लोकेशन साठी तलवाड्यातील दलाल काही मुले ठेवले असून ते जागोजागी कुणी आले का हे पाहण्यासाठी रात्रभर गस्त घालत असतात तसेच पोलीस प्रशासन महसूल प्रशासन अशा मुलांना साथ देत असून एकमेकांच्या संपर्कात असल्याचे चर्चा तलवाडा तसेच नागरिकांतून ऐकावयास मिळत आहे यामुळे कांबळे नावाचा वाळू तस्कर कोण? आहे याची चर्चा चांगलीच रंगताना दिसून येत आहे



### तलाठी मंडळ अधिकारी कर्मचारी वसुली गुंग गोदाकाचे नागरिक परेशान

बोरगाव गंगावाडी काठोडा या गोदाकाची वाळू का बंद होत नाही याला कारणीभूत म्हणजे तलवाडा पोलीस स्टेशन पोलीस निरीक्षक नरके व त्यांची रायटर कारणीभूत तर महसूल चे मंडळ अधिकारी बाबा बडे बोरगाव गंगावाडी राजापूर आणि काठोड येथील तलाठी यांना वाळू माफिया महिन्याकाठी लाखोचा हप्ता रुपी मलिदा मिळत असल्यामुळे अवैध वाळू बंद करण्यात अपयशी ठरत असून त्यांच्या विरोधात जनतेत संतप्त भावना निर्माण होत असताना या सर्वांना जिल्हा पोलीस अधीक्षक ठाकूर व तहसीलदार खोमणे यांचा आशीर्वाद असल्यामुळे हा सर्व प्रकार सुरु असल्याचे जनतेत बोलले जात आहे यामुळे गेवराईचे धडाकेबाज समजले जाणारे आ.लक्ष्मण पवार मात्र मूग गिळून गप्प असून त्यांनी विधानसभेत याप्रकरणी आवाज उठवावा अशी मागणी गोदाकाच्या नागरिकांतुन होत आहे.

बीड ।प्रतिनिधी
(सायं दैनिक महाराष्ट्र आरंभ)

तालुक्यात गेले अनेक दिवसापासून अवैध वाळू उपसा सुरू असताना गेवराईचे आ. पवार गप्प असल्याने जनतेत सुलट चर्चा होत असताना येथील वाळू माफियांच्या डोक्यावर वाळू संबंधित अधिकाऱ्यांचा हात असल्याचा स्पष्ट होत आहे, रात्री बेरात्री १० वाजण्याच्या सुमारास गोदावरी नदी पात्रातून ट्रॅक्टर द्वारे वाळू गावाच्या आतुन बाहेर काडली जाते आणि गावात व गावाच्या बाहेर ठीक ठिकाणी वाळूची साठवणूक केली जाते त्या नंतर जेसीबी द्वारे टिपर, हाईवा, ट्रक, इत्यादी अवजड वाहने भरली जाते आणि माजलगाव गेवराई व अन्य ठिकाणी पाठवली जाते पण हे सर्व वाळू चोरटे चोरी करत असतांना काठोडा वाळू माफिया गुंड प्रवृत्तीचे असल्यामुळे गुंज ग्रामस्थ त्यांच्या भिती मुळे मुगगिळून बसले आहेत, हायवा ट्रॅक्टरचा कर्कस आवाजाणे झोप येत नाही दिवसा शेतकरी, मजुर, इत्यादी ग्रामस्थ काम करून येत असतात आणि अस्यात ट्रॅक्टर चा व इतर अन्य अवजड वाहनांच्या कर्कस आवाजाने झोप येत नाही.

काठोडा बोरगाव या ठिकाणी गेल्या चार महिन्यापासून अवैध वाळूचा सुरू असून या हवेत वाळू उपशाला तहसीलदार खोमणे मंडळ अधिकारी बाबा बडे तलाठी व ठिकाणचे बीट अंमलदार खाडे या वसुली रायटरचा अधिकाऱ्यांचा वाळू माफियांच्या डोक्यावर हात ग्रामस्थांना त्रास याकडे प्रशासन लक्ष का देत नाही, समंधीत अधिकाऱ्यावर लक्ष का देत नाही, असे अनेक प्रश्न आहेत की या कडे प्रशासन दुर्लक्ष करीत आहे, वाळू चोरावर कारवाही करण्या ऐवजी त्यांच्या सोबत हात मिळवणी करतात संबंधित अधिकारी, काटोडा शिरसदेवी जातेगाव गावातील ट्रॅक्टरने रात्रीच्या वेळी वाळूचा उपसा करतात व अनेक ठिकाणी काठोडा व परिसरात वाळूची साठे आहेत.

माजलगावातील एक वाळूमाफिया स्वतःचे ट्रॅक्टर हायवा जेसीबी आणि इतर साहित्य घेऊन या ठिकाणी गेल्या चार-पाच महिन्यापासून आवैध वाळू उपसा करत असताना त्याच्याकडून तलवाडा पोलिस महसूलला मोठ्या प्रमाणात हप्त्यापोटी लाखोचा मलीदा मिळत असल्यामुळे त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे .

गेवराई उपविभागाचे पोलीस अधिकारी राजगुरू या ठिकाणी कार्यरत असून त्यांना मात्र या ठिकाणी खुर्ची सुटत नसल्यामुळे गेवराई तालुक्यात खुले आम अवैध धंदे सुरू आहेत त्यातून त्यांना त्यांनाही मोठा आर्थिक लाभ महिन्यासाठी मिळत असल्यामुळे त्यांनी काही मर्जीतील कर्मचारी व तलवाडा पोंलिसांच्या सहकार्याने मुक समिती दिल्याचे दिसून येत आहे एवढे होत असताना मात्र वर्ष झाले तरीही संबंधित अधिकाऱ्याला केबिनच्या बाहेर येऊन आवैध धंदे व वाळू माफियावर कारवाई करण्यास वेळ नाही की काय ..?या वरिष्ठाच्या सहकार्यामुळे राजकीय पुढार्यांचे आशीर्वादाने हा सर्व प्रकार सुरू आहे का असे अनेक प्रश्न नागरिकांत निर्माण होत आहेत मात्र एवढे होत असताना आम्ही किती चांगले आणि किती कर्तव्यदक्ष आहेत या त्वर्यात हे अधिकारी सध्या वावरत असताना दिसत आहेत व त्यांच्या विषयी जनतेत चर्चा होत आहे . तर हे असून नसल्यासारखे असून हे अधिकारी म्हणजेच बिनाकामाचा तालुक्याला लाभलेला अधिकारी अशे जनतेत बोलले जात आहे.

आमदार साहेब सध्या शाळा सुरू झाले असून अवैध वाळूच्या वाहनाचा परिणाम सध्या लेकरांचे अभ्यासावर होत आहे . वाहनांचा रात्रभर वाळूमाफियांचा धिंगाणा हायवा ची वाहतूक जोमात ट्रॅक्टर वर होणारे गाणे हा सर्व प्रकार सुरू असताना आपण गप्प का..? सध्या सर्वत्र शाळा सुरू झालेल्या असून गोदाक्का टच्या नागरिकांना जेवढा त्रास होतो त्याहीपेक्षा ज्यादा त्रास शालेय विद्यार्थ्यांना होत आहे रात्री अभ्यास करताना ट्रॅक्टर हायवा ट्रक जेसीबीच्या कर्कश आवाजामुळे त्रास , रस्त्यात होत असलेले खड्डे, असे अनेक समस्या आहेत या कडे - प्रशासनाने गांभीर्य पाहता लक्ष्य द्यावे अन्यता ग्रामस्थ अचानक रात्रीच्या वेळी तहसील कार्यालय गेवराई येथे आंदोलन करतील याची दखल घ्यावी असे बोलले जात आहे.



# कोमलवाडीच्या तलावात डोंगर भागातून पावसाचे पाणी येण्याचा मार्ग मोकळा; तलावात पाणीसाठा वाढणार

**भोजगाव-कोमलवाडी ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुर्यकांत धनवडे यांच्या पुढाकाराने अखेर हा मार्ग मोकळा!**

**यावर्षी तलावात पाणीसाठा वाढणार आणि शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार - उपसरपंच धनवडे**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील कोमलवाडी शिवारात एक तळं आहे. आणि त्या तळ्यात गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी एक शासकीय विहीर आहे. त्या तळ्यापासून काही अंतरावर डोंगर असून त्या डोंगर भागातील पावसाचे पाणी त्या तळ्यात येण्यासाठी त्या ठिकाणाहून चारी काढण्यात आलेली होती. परंतु मागील काही वर्षांपासून तेथील काही शेतकऱ्यांनी ती चारी अडवून येणारे पाणी बंद केले होते. त्यामुळे डोंगर भागातील पावसाचे पाणी कोमलवाडी शिवारातील तलावात येत नसल्याने पाणीसाठा वाढत नव्हते, तसेच परिसरातील विहिरींना देखील पाणी राहात नसे, यामुळे ग्रामस्थांना व परिसरातील शेतकऱ्यांना पाण्याची मोठी गैरसोय होत होती. तलावाचे खोलीकरण व गाळ काढण्याचे काम मोठ्या प्रमाणावर झाले आहे. परंतु डोंगर भागातून येणारे पाणी अडवणूक झाल्याने तलावात पाणीपातळी वाढत नव्हती. तलावात पाणी साठा झाला नाही तर शेतकऱ्यांचे व जनावरांचे तसेच तलावातील शासकीय विहीरीत देखील पाणी येत नव्हते. यामुळे मोठी पाणीटंचाई निर्माण होत होती. याप्रकरणी गावचे उपसरपंच सुर्यकांत धनवडे यांनी गेवराई तहसीलदार यांना लेखी निवेदन दिले होते.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील कोमलवाडी शिवारात एक तलाव आहे. तसेच त्या तलावात एक शासकीय विहीर आहे. त्या विहिरीतून गावाला पाणी पुरवठा होतो. परंतु त्या तलावात पाणी साठा वाढावा म्हणून भोजगाव-कोमलवाडी ग्रुप ग्रामपंचायतीचे उपसरपंच सुर्यकांत धनवडे यांनी पुढाकार घेऊन गावकऱ्यांनी मिळून शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी, जनावरांना पिण्यासाठी तसेच गावकऱ्यांना पिण्यासाठी पाणी या तलावाची पाणीपातळी वाढवी म्हणून पाणी वाहण्यासाठी जेसीबीने चारी काढली आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी व गावकऱ्यांच्या पिण्याची सुद्धा गैरसोय होणार नाही. यामुळे यावर्षी पावसाने चांगली साथ दिली तर शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे.

# बहिणींना वस्त्र पुरवणारे श्रीकृष्णाचे हात हवेत, दादा!

प्रशांत बाफना

प्रिय दादास,

अलीकडं लय कौतुक करू लागलास बहिणींचं. वहिनी पराभूत झाल्या आणि फारच शहाणपण सुचलं असं दादा, तुझ्या वागण्यावरुन वरकरणी तरी दिसतंय. पण दादा, तुझा हा स्वभाव नाही. तू फटकळ आहेस. संवेदनशील नाहीस असं मी म्हणणार नाही, दादा. पण ती जाण असूनही तुझ्यातील वात्रटपणा जास्त दिसतो. तो तू जाणीवपूर्वक जपतोस. लाडक्या बहिणीला महिन्याला पंधराशे रुपये देण्याचा तुझा संकल्प हा महिलांसाठी विकल्प आहे. थांब दादा, राग नको मानूस. त्या बहिणीच्या घरात तिची लेकरं शिकून हाताला काम नाही, त्यासाठी काही केलं असतंच तर दादा, येणार्या दिवाळीची ओवाळणी दिलीस म्हणून समजू शकले असते रे... लोकसभा निवडणुकीत तुम्हाला अपेक्षित यश आले नाही म्हणून तुम्ही मध्य प्रदेशच्या शिवराज चौहानांच्या दाताताील काडी घेवून इकडे दात कोरून पोट भरण्याची बाष्कळ योजना राबवत आहात, काय म्हणावं दादा तुम्हाला?

सकाळी तुम्ही 'लाडकी बहीण' म्हणत योजना आणता, दुपारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्याला पावडर लावून सरकारच्या उघड्या पडलेल्या पार्श्वभागावर ठिगळं लावायला जिल्हाधिकार्यांना आदेश देतात. तिसरीकडे संध्याकाळी सरकारचे मूळ मालक सातबारा घेवून पुढे येतात. हो, देवाभाऊ फडणवीस! ते आणखी सुधारणा केल्याची टिमकी वाजवतात. याचा अर्थ दादा, तुमच्या सरकारमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही किंवा तुम्ही आणि शिंदे कळसूत्री बाहुल्या आहात देवाभाऊंच्या हातातील. त्यांनी तुम्हाला पद्धतशीरपणे खेळविले आहे. आश्चर्य याचं वाटतं दादा, की तुम्ही इतके मुरब्बी राजकरणी आहात, हा समज आमचा चुकीचा होता का? याचं आम्हालाच आमचं हसू यायला लागलं आहे. तुम्ही पुचाट निघाला आहात दादा, अशी समस्त बहिणी वर्गाची धारणा झाली आहे. हे खरं आहे. तुम्हाला तुमच्या महाराष्ट्रातील बहिणींविषयी आत्मियता असती तर दिवसाढवळ्या महिलांच्या अब्रूचे जे धिंडवडे निघत आहेत, त्यावर तुम्ही निर्बंध आणले असते.

समाजातील अशा वृत्तीकडून कोणत्या बहिणींनी त्यांना वस्त्र पुरवण्याची अपेक्षा ठेवावी. दादा, महाराष्ट्रातील प्रत्येक स्त्रीला आज वस्त्रे पुरवणार्या श्री कृष्णाच्या हातांची गरज आहे, महिन्याला १५०० अशा फुटकल आर्थिक मदतीतून कुणाचाच उद्धार होणार नाही. तुमचे पंधराशे रुपये एका दिवसाचं बारमधील नवर्याचा अनाठायी खर्च आहे दादा. ते बार, पब बंद केलेत ना दादा, तर तुझ्या समस्त बहिणींचे संसार दख्खनच्या पठारावर विविधांगी फुलं फुलावी आणि निसर्ग नटावा तसं संसार नटून राहिल, दादा.

दादा, सरकारी योजना खरंच वंचित जनतेसाठी असतात की, त्यात सरकारी अधिकार्यांची सोय असते? जेवढ्या योजना मंत्रालयातून पिकवल्या जातात, त्याचा रसही मंत्रालय आणि सरकारी अधिकार्यांच्या घशात उतरतो. तेव्हा दादा, योजना आणण्यापूर्वी झारीतील शुक्राचार्य ठेचून काढा. ते काढायचे असतील तर त्यांच्या बदल्यांतील राजकारण आणि पैशांच्या थैल्यांची आयात थांबवली पाहिजे दादा. ती जोपर्यंत थांबत नाही, तोपर्यंत सरकार कुणाचेही येवो... सामान्य जनता बेजारच राहिल.

हाताला मिळेल ते काम आणि रोजगार क्षेत्र वाढविले पाहिजेत. बार, पब अगदी अंमलीपदार्थ साठे आणि साठवणूकदार उद्धवस्त केले पाहिजेत. महाविद्यालयाबाहेर अंमली पदार्थ पुरवणारे विकृत लोकं संसार आणि संस्कृतीचे मारेकरी आहेत, त्यांना अद्दल घडविली पाहिजे दादा.

दादा, तुला माहित आहे का रे, मुलांच्या शाळेतील प्रवेशाची राज्यात काय अवस्था आहे. सहज प्रवेश न मिळणे किंवा कर्ज काढून प्रवेशाची कसरत करावी लागणे, हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या रयतेचे राज्य आहे असं कसं म्हणायचं? साधं शिक्षण घेता येत नाही, आरोग्य व्यवस्था अंथरुणाला खिळलेली आहे. महागडे औषधोपचार कुणाला परवडतात? आरोग्याच्या योजना 'सर्टिफाय मर्डरर' डॉक्टर कशा फस्त करतात, हे एकदा जाणून घेतलंत तर दादा, राजकारणातील तुमची इच्छा मरून जाईल. एक महिला घराची जबाबदारी खांद्यावर घेवून 'अभिमन्यूचा फसलेला चक्रव्युह' आयुष्यभर सोडवत असते.

महिलांचे बाळंतपण, त्यांना सकस आहार, गर्भवती माता रुग्णालय कुठं भंगारात निघाले आहेत का, यावर कटाक्ष टाकायला हवा. खासगी रुग्णालयात बाळंतपण अलीकडे नैसर्गिकरित्या करण्याचा वैद्यकीय क्षेत्रालाच विसर पडला आहे. हॉस्पिटलच्या देयकावरचे आकडे वाढविण्याकरिता जाणीवपूर्वक सिझर केले जाते, हे अवगत शास्त्र म्हणावं की गुन्हेगारांच्या टोळ्या वैद्यकीय क्षेत्रात शिकून सवरून विज्ञान युगाच्या हाका देत लुटत आहेत असं म्हणावं? कुणाचाच कुणाला पायपोस राहिला नाही, इतकी भयानक विषमता सरकार पोसत आहे, ते पहिल्यांदा थांबवा दादा.

बहिणींचे खांदे, हात, विचार करणारा मेंदू सक्षम आहे. कोट्यवधी महिला नोकरी करून आई- बाबांच्या, नवर्याच्या संसाराच्या रथाची चाके बनली आहेत. सगळं अंगवळणी पाडून घेतले आहे आणि शिक्षणाचा फायदाही त्यात आहेच. महिलांनी स्वतःच्या मनगटावर अस्तित्व निर्माण केले असताना सरकार कधीही त्यांची जबाबदारी पेलायला पुढे येत नाही. योजना राहू द्या... पण मोकळेपणाने महिला श्वास घेवून स्वच्छंदी वातावरणात निर्भीडपणे जगतील, याची शाश्वती देणारे 'अभयहस्त' सरकार बहिणींच्या डोक्यावर कधी ठेवणार आहे? नोकरीवरून घरी जाताना, रात्री उशीर झाला तर ती रात्र जीवघेणी ठरते. अगदी रेल्वे प्रवास, अलीकडे तर ओला, उबेरमधील घटना पाहून महिलांच्या असुरक्षिततेबद्दल सरकार असंवेदनशील कसे असू शकते याची चिंता वाटते.

महागाईवर काय बोलायचं दादा! रोज मरे त्याला कोण रडे, नाही का? म्हणून मग रेशनवरच्या सडलेल्या डाळीवर बोलत नाही आणि तेलाचे भाव वाढले म्हणूनही विचारत नाही. पेट्रोल, डिझेलबाबतीत तुझे मत वेगळे होते दादा, नाही का, इकडे आल्यावर तेही बदलले. जमलं तर एवढं करा... या योजनेचा ग्रामीण भागातील महिलांना लाभ होईल अशी अपेक्षा व्यक्त करतानाच, ती रक्कम मिळविण्यासाठी तालुक्याच्या गावी जाताना खर्ची पडू नये, ही भितीही मनाला सतावत आहे. शेतकर्यांचा गळा घोटणारे दलाल राज्यातील प्रत्येक तहसीलदार, प्रांत, जिल्हाधिकारी कार्यालयात ठाण मांडून बसले आहेत, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. हे दलाल राजकीय पक्षांच्या नावाने अधिकार्यांशी भागीदारीत व्यवहार करत आहेत.

महसूल बुडवणार्या भामट्यांना आणि त्यांना मोकळं सोडणार्या महसूल अधिकार्यांच्या बेहिशेबी मालमत्तेची चौकशी केल्यास दादा, तुझ्या समस्त बहिणींच्या शेतातील मातीलाही सोन्याचा भाव मिळेल आणि तिचं सोन्याचं मंगळसूत्र पेढीवर, सावकाराकडे गहाण ठेवण्याची पाळी येणार नाही आणि महिन्यात तहसीलदार कार्यालयात जावून १५०० करिता लाचारीने हात पसरण्याची गरज लागणार नाही. तेव्हा दादा, बघ पटतात का... तुझ्या लाडक्या बहिणींच्या या मनातील आसवांनी भिजलेल्या भावना!

प्रशांत बाफना/शेवगांव८०५५४४०३८५

---

**कणखर ,समाजाप्रती प्रामाणिक ,अतिशय निष्पाप आणि एकही अॅट्रॉसिटी न करणारा कार्यकर्ता**

# दत्ता भाऊ कांबळे यांना वाढदिवसाचे अभिष्टचिंतन....

विद्यार्थी दशेपासून अंगी असलेले नेतृत्व गुण प्रचंड मोठी इच्छाशक्ती आणि जिद्द यामुळे अत्यंत गरीब परिस्थितीवर मात करून ऊसतोड मजुराच्या कुटुंबातून सामाजिक व राजकीय क्षेत्रात एक वेगळी छाप निर्माण करणारा तरुण आणि तडफदार कार्यकर्ता म्हणजे दत्ताभाऊ कांबळे होय. तसेच उच्चशिक्षित अभ्यासू अन्याय ,अत्याचाराची चीड असणारा व फुले, शाहू, डॉ .बाबासाहेब आंबेडकर, डॉ .अण्णाभाऊ साठे यांच्या विचारसरणीवर चालणारा कार्यकर्ता व शेतकऱ्यांचे प्रश्न, गायरान धारकांचे प्रश्न ,विद्यार्थी तसेच गोरगरीब मजुरांचे प्रश्न घेऊन लढणारा कार्यकर्ता म्हणून आज दत्ता कांबळे यांची ओळख सर्व दूर व सर्वसामान्य लोकांमध्ये निर्माण झालेली आहे. ब्रह्मगाव सारख्या अठरा विश्व दारिद्र्याने पछाडलेल्या लहानशा गावात दत्ता कांबळे यांचा ६ जुलै १९९१ चा जन्म. मातंग समाजाच्या व ऊसतोड मजुराच्या कुटुंबात जन्मलेल्या दत्ता कांबळे यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपले शालेय शिक्षण व पुढील शिक्षण पूर्ण केले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा ब्रह्मगाव, माध्यमिक शिक्षण जवाहर विद्यालय के. कॅम्प तसेच पदवीचे शिक्षण बीए जनसंवाद व पत्रकारिता, एम.ए.जणसंवाद आणि पत्रकारिता विद्या तसेच सध्या सुरू असलेले शिक्षण एम .ए. एम .फिल. शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद/ छत्रपती संभाजीनगर येथून घेतले असून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद /छत्रपती संभाजीनगर येथून विद्यार्थी दशेत आंबेडकरी चळवळीत सक्रिय सहभाग राहिलेला आहे. दत्ता कांबळे यांच्या समोर नेहमी सामाजिक चळवळीत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कामगार नेते लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची प्रेरणा राहिलेले आहे. आंबेडकरी चळवळीत आदर्श म्हणून ते आंबेडकरी चळवळीचे प्रणेते कर्मवीर ड.एकनाथराव आवाड यांना पाहतात. तर दत्ता कांबळे यांना राजकीय चळवळीत जे. एन. यु. दिल्ली येथील विद्यापीठाचे प्रा. डॉ. मिलिंद एकनाथराव आव्हाड यांनी राजकारणात येण्यासाठी प्रोत्साहित केले .

तसेच पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू व अखिल भारतीय काँग्रेस पार्टीचे नेते तथा लोकसभेचे विरोधी पक्ष नेते खासदार राहुल गांधी यांच्या राजकीय चळवळीतील आदर्श समोर ठेवून अखिल भारतीय काँग्रेस पक्षात आपले राजकीय कारकीर्द २०१९ मध्ये अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या अनुसूचित जाती विभागाची जिल्हाध्यक्षपदी दत्ता कांबळे यांची निवड होऊन सुरू झाली .अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या केंद्रीय कार्यकारी सदस्य खासदार रजनी ताई पाटील ,माजी मंत्री अशोक दादा पाटील तसेच पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी शिक्षण सभापती राजेसाहेब देशमुख यांच्या सोबत जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या मजबुतीसाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. त्याचबरोबर सन २०२३ मधील नुकत्याच पार पडलेल्या नगरपंचायत ,नगरपरिषद तसेच अलीकडील लोकसभेची निवडणूक असेल याच्यात तसूभर ही कसर न सोडता जिल्ह्याभरात



काँग्रेस विचाराचा उमेदवार निवडून आणण्यासाठी अहोरात्र प्रयत्न केलेले आपण सर्वांनी पाहिले आहे.

तसेच सर्वच राजकीय पक्षातील प्रमुख नेत्यांपासून ते सामाजिक संघटना तसेच आंबेडकरी चळवळीतील नेते व कार्यकर्ते यांच्या सोबत जिव्हाळ्याचे संबंध सांभाळणारा एक युवा आणि कणखर कार्यकर्ता म्हणून त्यांची एक वेगळी ओळख निर्माण झालेली आहे.

तसेच जिल्हाभरातील सामाजिक तेढ ,जातीय दंगल असो किंवा दलित सवर्ण वाद असो अश्या परस्तिथित अतिशय सामंजस्याने व सावध भूमिका घेत जिल्हाभरातील कुठल्याही प्रकरणात आत्तापर्यंत एकही ट्रॉसिटी न होऊ देणारा कार्यकर्ता म्हणून फार मेहनतीने आपली ओळख निर्माण केली असून,वेगळ्या मार्गाने आपल्या समाजाला न्याय देणारा कार्यकर्ता म्हणून एक विशेष ओळख दत्ता कांबळे यांनी निर्माण केली आहे .

स्वतः ला एक इंच शेती नसून सुद्धा शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी मध्ये झालेले नुकसान भरपाईसाठी आंदोलन असेल, गायरान अतिक्रमण धारकांच्या नावे जमिनी होण्यासाठी आंदोलन असेल, तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्कमाफी बाबत आंदोलन असेल,आरक्षण बचाव आंदोलन ,इंधन दरवाढ आंदोलन ,मजुरांना वीज बिल माफी आंदोलन, पुनर्वसनच्या पिण्याच्या पाण्यासाठी आंदोलन, जातीय अन्याय किंवा दलितांवरील अत्याचार विरोधी आंदोलन असेल किंवा स्त्रियांच्या सन्मानार्थ वेगवेगळे उपक्रम असेल ,असे एक ना अनेक नाविन्यपूर्ण उपक्रम आणि दर्जेदार आंदोलने दत्ता कांबळे यांनी जिल्हाध्यक्ष पदाच्या चालू असणाऱ्या कार्यकाळात केलेली सर्वांनी पाहिलेले आहेत. आता या सर्वसामान्य कुटुंबातून आलेल्या संघर्षशिल नेतृत्वास समाजातील विविध घटकांनी निस्वार्थ मदत करणे अपेक्षित आहे. कारण एवढ्या कठीण काळात दत्ता कांबळे हे आकाशाला गवसणी घालण्याच सामर्थ्य आणि धैर्य आपल्याकडे ठेवतात. त्याच्यामुळेच दत्ता कांबळे यांनी निस्वार्थी सामाजिक व राजकीय काम करत वेगवेगळ्या आव्हानांना सामोरे जातात. आता समाजाला दत्ता कांबळे यांच्या रूपाने एक नवीन नेतृत्व उभारण्याची अमुलाग्र संधी प्राप्त झाली , असून आता समाजातील विविध घटकांनी विविध माध्यमातून दत्ता कांबळे यांना पुढील वाटचालीसाठी भक्कम साथ द्यावी हीच अपेक्षा. शेवटी दत्ता कांबळे यांच्या निस्वार्थ सामाजिक कार्याला सलाम करून त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्त मनःपूर्वक शुभेच्छा .

धन्यवाद...

शब्दांकन
**अनंत घडसींगे**
पत्रकार तथा मा.सदस्य समन्वय व पुनर्विलोकन समिती

---



## श्री क्षेत्र भगवानगडाची पालखी पंढरपूरकडे मार्गस्थ

भगवानगड : लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाची पालखी आज शुक्रवार दि.५ जुलै रोजी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. हीच परंपरा भगवानगडाच्या स्थापनेपासून ते आजतागायत सुरु आहे. श्री क्षेत्र भगवानगडावरुन निघणाऱ्या या पायी पालखी सोहळ्याचे शुक्रवार दि.५ जुलै रोजी दुपारी ठीक ४ वाजता पंढरपूरकडे प्रस्थान झाले आहे. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, पिपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, संत भगवानबाबा संस्थान बोरकिन्ही, भाग्येश्वर संस्थान, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो. ह.भ.प.महंत न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्रीजी यांच्या मार्गदर्शनाखाली निघालेल्या या भव्यदिव्य पालखी सोहळ्याच्या प्रस्थानावेळी भगवानगड परिसरातील हजारो भाविकांची उपस्थिती होती.

---

# पिक विमा योजनेस पर्यायी योजना आणण्यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समितीची नेमणूक - धनंजय मुंडे

**विधानसभेतील २९३ च्या प्रस्तावास कृषी मंत्री धनंजय मुंडेंकडून संत तुकाराम वाणीसह उत्तर**

२०२३ चा उर्वरित पीकविमा जुलै अखेर पर्यंत देणार, या वर्षात आतापर्यंत ७ हजार कोटी विमा वाटप; २०१६ पासूनची रेकॉर्डब्रेक आकडेवारी - मुंडेंची माहिती

मुंबई - राज्याचे मुख्यमंत्री, दोन्हीही उपमुख्यमंत्री तसेच कृषिमंत्री म्हणून मी स्वतः पिक विमा कंपन्यांच्या सोबत सातत्याने बैठका घेऊन मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीचा विमा तातडीने वितरण केला जावा, यासाठी वारंवार पाठपुरावा करत असतो. त्यानुसार यावर्षी राज्यात अग्रीम मध्येच विक्रमी पिक विमा वाटप करण्यात आले आहे. मात्र तरीही विविध पीक विमा कंपन्यांचे विमा नुकसान देण्याबाबतचे धोरण आणि दप्तर दिरंगाई याबाबत शेतकऱ्यांच्या व बऱ्याच लोकप्रतिनिधींच्या नेहमीच तक्रारी येत असतात त्यावरून पिक विमा योजनेवरती आपण सर्व समाधानी आहोत असे नाही, त्यामुळेच शेतकऱ्यांना अधिकचा आधार व अडचणीच्या काळात दिलासा मिळावा या दृष्टीने पिक विमा योजनेला पर्यायी योजना आणण्यासाठी कृषी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एका अभ्यास समितीची नेमणूक करण्यात आलेली असून ही समिती देशातील इतर राज्यांमध्ये राबवली जाणारी पिक विमा योजना तसेच ज्या राज्यांमध्ये पिक विमा योजनाच लागू नाही अशा राज्यांमध्ये शेतकऱ्यांना कोणत्या पद्धतीने नुकसानी बाबत लाभ दिला जातो याचा परिपूर्ण अभ्यास करून याबाबतचा अहवाल लवकरच शासनास सादर करेल, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत बोलताना दिली.

विधानसभेत आज २९३ च्या प्रस्तावा नावे विविध सदस्यांनी मांडलेल्या प्रस्तावास कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी उत्तर दिले. यावेळी सन २०२३ च्या खरीप हंगामात पावसाने झालेल्या नुकसानी पोटी अग्रीम २५% प्रमाणे पिक विमा वितरण करण्यात आले. याद्वारे राज्यात विक्रमी ७००० कोटी रुपयांचा विमा मंजूर करण्यात आला, तर यापैकी ४००० कोटींपेक्षा जास्त विमा रकमेचे वितरण पूर्ण झाले व उर्वरित रक्कमेचे वितरण सध्या सुरू आहे. विशेष म्हणजे २०१६ पासून आजपर्यंतची विमा वितरणाची ही आकडेवारी रेकॉर्ड ब्रेक असून यामध्ये अंतिम पीक कापणी अहवाला नंतर सरासरीच्या हिशोबाने येणारी पिक विमा रक्कम याची त्यात वाढ होणार असून अंतिम पीक कापणी नंतरचे पीक विम्याचे वितरण सुद्धा जुलै महिन्याच्या अखेरपर्यंत पूर्ण केले



जाईल, असेही धनंजय मुंडे यांनी सभागृहात सांगितले.केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे जी पाच राज्य विविध पिकांच्या हमीभावाच्या किमतींची शिफारस करतात, त्यामध्ये महाराष्ट्र देखील एक प्रमुख राज्य असून वेगवेगळ्या राज्यांनी विविध पिकांना सुचवलेल्या किमतींमध्ये असलेल्या तफावतीमुळे बऱ्याचदा हमीभावामध्ये मोठ्या प्रमाणात तफावत येते. त्यामुळे हमीभाव सुचवताना सर्व राज्यांची सुसुत्रता व एक वाक्यता असावी असे आपण नुकत्याच केंद्रिय कृषी मूल्य आयोगाच्या बैठकीमध्ये प्रस्तावित केले असून याचीही अंमलबजावणी याच वर्षीपासून होणार असल्याचेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

दरम्यान आजच्या उत्तरामध्ये धनंजय मुंडे यांनी यावर्षी सरासरी पावसाच्या तुलनेमध्ये राज्यात झालेली पेरणी, बी-बियाणे, खते, कीटकनाशके यांची उपलब्धता, विविध शासकीय योजनांमधील लाभार्थ्यांची आकडेवारी, त्याद्वारे विविध योजनांसाठी खर्च करण्यात आलेला निधी, तसेच अगदी राज्य शासनाच्या कृषी हेल्पलाइन च्या व्हाट्सअप क्रमांकावर आलेल्या तक्रारींच्या निवारणाची आकडेवारी सुद्धा सभागृहामध्ये सांगितली. तर धनंजय मुंडे यांनी संत तुकारामांच्या 'बरे केले देवा कुणबी झालो। नाही तर दंभेची असतो मेलो।' या अभंगवाणीने आपल्या उत्तराचा समारोप करत आपण सर्व लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांची मुले आहोत व सर्वांच्या सहकार्यातून आपण शेतकऱ्यांच्या हितासाठी काम करू अशी माहिती दिली.

---

**टी.सी. हरवला आहे**

कोमल बाबू घडसिगें या नावाचा दहावी पासचा टीसी हरवला आहे.

सापडल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

९८८१८८०९७०

# वर्षा ऋतू आणि आयुर्वेद....

पावसाळ्यामध्ये जमिनीतून निघणाऱ्या बाष्पामुळे पाणी हे अम्ल विपाकी बनते.जसे पाणी अम्लविपाकी बनते तसे ,वनस्पती देखील अम्लधर्मी होतात.मनुष्याचे भरण पोषण असे अन्नावर अवलंबून असल्यामुळे शरीर ही अम्लधर्मी बनते ...



त्यामुळे अपचन ,ऍसिडिटी होणे ढेकर येणे यासारखा त्रास होतो... त्यासाठी पाणी उकळत असताना त्यात सुंठ चा लहान तुकडा टाकावा,असे पाणी प्यावे... पावसाळ्यातील पाणी आकाशातील वायुमंडलातील असलेले धुळीचे कण, विषारी कण,नाना प्रकारचे अपायकारक सूक्ष्मजंतू पावसासोबत जमिनीवर येतात.असे पाणी जमिनीत मुरते आणि वाहत असताना जमिनीवर साठलेले, खुजलेले पदार्थ त्या पाण्यात मिसळतात.अश्या दूषित पाण्यामुळे कॉलरा,गॅस्ट्रो, हगवण,कावीळ ,पोटाचे विकार यकृतवृद्धी ,टायफॉइड यासारखे आजार देखील होताना दिसतात.त्यासाठी संपूर्ण पावसाळा उकळून गार केलेले पाणीच प्यावे.फिल्टर चे पाणी आणि उकळून गार केलेले पाणी यामध्ये खूप फरक असतो.आपल्याला शरीराला आवश्यक असणारे खनिज ही फिल्टरच्या पाण्यात निघून जातात.उकळून गार केलेले पाणी पचायला खूप हलके असते..

पावसाळा हा कीटक संकटाचा काळ असतो

मच्छर, किडे, मुंग्या यासारखे प्राणी चावलाने लहान बालकापासून मोठया लोकांपर्यंत चकते उठणे ,मलेरिया, डेंग्यू यासारखे व्याधी प्रकर्षाने जाणवतात.त्यासाठी रोज संध्याकाळी घरांमध्ये धूपन करावा. कडूलिंबाचा कोरडा पाला ,गुगुळ ,लसणाच्या पाकळ्या ,ओवा याचा वापर करून करावा.

पावसाळ्यामध्ये आपल्या शरीरातील वातदोष हा अधिक प्रमाणात वाढलेला असतो. परिणामी हाता पायाला मुंग्या येणे ,हाडांमध्ये वेदना होणे, सांधेदुखी ,गुडघेदुखी यासारखे आजार डोके वर काढतात. त्यामुळे पावसाळ्यामध्ये रोज नित्य अभ्यंग करावे.तेलाने मालिश करावी.अधिक प्रमाणात त्रास असल्यास पंचकर्मातील बस्ती कर्म करून घ्यावे..पावसाळयामध्ये आपल्या शरीरामध्ये अग्निमांद्य असते. आपली भूक ही कमी झालेली असते .त्यामुळे अपचन ,पोट फुगणे अश्या तक्रारी जाणवतात. ते होऊ नये यासाठी पचायला जड असलेले पदार्थ ,भिजवलेले, मोड आलेले धान्य, कडधान्य या ऋतूंमध्ये टाळावे. धान्यामध्ये सर्व धान्य भाजूनच खावे . शक्यतो जुने धान्य वापरावे. गव्हाच्या पिठामध्ये चिमूटभर ओवा टाकून पीठ मळावे. जेणेकरून पोटात गॅसेस होणार नाहीत. पावसाळ्यामध्ये पालेभाज्या कमी प्रमाणात वापराव्या.कारण पालेभाज्या ह्या वातदोष वाढवणाऱ्या असतात. मुगाचे ,तुरीचे वरण , आख्खे भाजून,मसूर ह्या गोष्टी खाव्या. शेवग्याचा पाला ,ढेमसे ,करवंद कार्ले ,पडवळ ,दोडके, गाजर यासारख्या भाज्या खाव्यात. भाज्या बनवताना,त्यांना तुपाची फोडणी देऊन धने ,जिरे ,आलं लसूण, खोबरं याचा वापर करावा, म्हणजे पचायला त्या हलक्या होतात. रोजच्या आहारामध्ये मधाचा वापर करावा.

पावसाळ्यात व्यायाम अति प्रमाणात करू नये. दिवसा झोपणे ,नदीचे पाणी पिणे ,उन्हात फिरणे ,ओस पडत असल्यास बाहेर पडणे या गोष्टी टाळाव्या.पावसाळ्यामध्ये तांदूळ १४ पट पाणी टाकून शिजवावा. त्याला जिरे ,कढीपत्ता ,अद्रक ,मीठ आणि थोडसं कोकम टाकून तडका द्यावा आणि ते प्यावे. जेणेकरून पावसाळ्यात येणार दौबल्य,थकवा हे दूर होऊन सर्व धातू पोषण होईल आणि तुमची भूकही वाढेल....याप्रमाणे आयुर्वेदातील ऋतुचर्यचे जर आपण पालन केले तर पावसाळ्यातील निसर्गाचा आनंदही घेता येतो आणि आरोग्य देखील सांभाळता येते.....

डॉ.अंबिका नरवडे (आयुर्वेदचिकित्सक व पंचकर्म तज्ञ)

शाखा.१)नरवडे आयुर्वेद क्लिनिक व पंचकर्म सेंटर,सागर गैरेज समोर,रतन रेस्टॉरंटच्या बाजूला, शाहूनगर, पांगरी रोड, बीड

शाखा.२) श्री स्वामी समर्थ दाताचा दवाखाना, दीपक कॉम्प्लेक्स, भगवान महावीर शाळेच्या बाजूला,रामनगर, एन २,सिडको, छ.संभाजीनगर

संपर्क..९८९०४२३४६२



# विधानपरिषदेची उमेदवारी मिळाल्याबद्दल पंकजाताईंचा डॉ.योगेशभैय्यांकडून सत्कार

**बीड (प्रतिनिधी)**

**दि.५ : भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांची विधानपरिषदेसाठी उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी मुंबईत भेटून शुक्रवारी (दि.५) सत्कार केला. दरम्यान, पंकजाताईंची निवड जवळपास निश्चित मानली जात आहे.**

पंकजाताई मुंडे व डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ. सारिकाताई क्षीरसागर यांचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत. विधानपरिषदेची उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन सत्कार केला. त्यांच्यासोबत बीड विधानसभा मतदारसंघातील राजकीय, सामाजिक विषयांवर चर्चा झाली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, पालकमंत्री ना.धनंजय मुंडे आणि महायुतीच्या नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातून येत्या काळात जिल्ह्याचा विकास होईल, असा विश्वास डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, आगामी राजकीय वाटचालीसाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांना पंकजाताईंनी 'आशीर्वाद' दिले.



**विश्वविजेत्या भारतीय क्रिकेट संघातील खेळाडूंचा आज मुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे, उपमुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीसजी यांच्या प्रमुख उपस्थितीत विधानभवन येथे सत्कार करण्यात आला. तब्बल १७ वर्षांनी या संघाने ऐतिहासिक कामगिरी करत वैश्विक विजय खेचून आणत करोडो भारतीयांना निखळ आनंद मिळवून दिला आहे. त्यामुळे या सत्कार सोहळ्यास उपस्थित राहून संघातील खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करत, सर्वांना शुभेच्छा दिल्या.**
**– धनंजय मुंडे**

# दलित पँथरचे संस्थापक राजा ढाले यांनी स्थापित केलेल्या गंधकुटी बुद्ध विहाराची तोडफोड करणाऱ्यांवर कार्यवाही करा

## माजी मंत्री डॉ. नितीन राऊत यांची सभागृहात मागणी

मुंबई/नागपूर (प्रवीण बागडे)

दलित पँथरचे संस्थापक आणि आंबेडकरी चळवळीचे भाष्यकार ज्येष्ठ विचारवंत नेते राजा ढाले यांनी स्थापित केलेल्या गंधकुटी बुद्ध विहाराची समाजकंटकांनी तोडफोड केली होती. २८ जून रोजी घडलेल्या या घटनेच्या तक्रारीची नोंद अद्यापही घेण्यात आली नाही. प्रकरणी या संदर्भात गुन्हा दाखल करण्याची मागणी आज सभागृहात राज्याचे माजी मंत्री आणि उत्तर नागपूरचे आमदार डॉ. नितीन राऊत यांनी केली.

राजा ढाले म्हणजे मूर्तिमंत बंडखोरी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, न्यायाच्या प्रवाहातून तावून सुलाखून निघालेला तत्त्वज्ञ. १९७० च्या दशकात आधी साहित्यातून त्यांनी आपल्यातील बंडखोरीची पहिल्यांदा महाराष्ट्राला ओळख करून दिली. कालकथित राजा ढाले पँथर यांनी ४० वर्षे पूर्वी रमाबाई आंबेडकर हे नाव एका आदर्श स्त्रीचे असून त्या नावाला साधेसे से वर्तन असणारे नगर निर्माण व्हावे या हेतूने व बौध्द धम्माचा निशुल्क प्रसार आणि प्रचार करण्याचा निस्वार्थ भावना ठेवून गंधकुटी विहाराची स्थापना केले असल्याचे यावेळी डॉ. राऊत यांनी म्हंटले.

या विहाराच्या बांधकामापासून ते आजतागायत डागडुजीसाठी लागणारा खर्च स्वतः राजा ढाले व त्यांची पत्नीने केलेला आहे. समाज सेवेच्या हेतून त्यातून कोणतेही उत्पन्न न घेण्याचा त्यांचा मानस आजतागयत कायम आहे. २८ जून २०२४ रोजी झालेल्या घटनेत ढाले कुटुंबियाने



स्थापित केलेली भगवान गौतम बुद्धांची मुर्तीही गायब करण्यात आली आहे. सदर बुध्द विहारचे सर्व कागदपत्रे राजा ढाले व त्यानंतर दिक्षा ढाले यांच्या पत्नीच्या नावे असल्याचे डॉ. राऊत यांनी सभागृहात सांगितले.

यावेळी बोलतांना दिंगम्बर पाईकराव या ठेकेदाराने ने कुठलीही शासनाची परवानगी न घेता विहाराची तोडफोड करुन नुकसान केले आहे. घडलेल्या घटनेची तक्रार पंतनगर पोलिस स्टेशन यांना केली असता तक्रारीची नोंद घेण्यात आलेली नाही. प्रसंगी सदर ठेकेदारांसह यात सहभागी सर्व आरोपींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी विधिमंडळात डॉ.राऊत यांनी केली.

आज दीक्षाभूमीची पाहणी करणार

१ जुलै रोजी नागपूरातील दीक्षाभूमीवर घडलेल्या तोडफोड आणि जाळपोळीच्या घटनेनंतर आज दिनांक ६ जुलै ला सायं. ५ वाजता राज्याचे माजी मंत्री आणि नागपूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री डॉ.नितीन राऊत भूमिगत पार्किंगच्या स्थळाकरिता पाहणी करुन संविधान निर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. दीक्षाभूमी येथील अंडरग्राउंड पार्किंगच्या मुद्दा डॉ. राऊत यांनी विधानसभेत लावून धरला होता. दरम्यान, याची दखल घेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात तात्काळ येऊन दिक्षाभूमी येथील पार्किंगच्या कामाला स्थगिती देण्याची घोषणा केली. दरम्यान शनिवारी नागपूर येताच दीक्षाभूमी येथे भेट देऊन पाहणी करणार आहेत.

# सिने अभिनेत्री सिद्धी, यांचा सत्कार!

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सांस्कृतिक विभाग प्रदेश कार्यकारी प्रमुख सिद्धी कामथ यांचा मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात मोठे यश मिळाल्याबद्दल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी सेल व विभागाच्या वतीने प्रांताध्यक्ष नानासाहेब पटोले यांच्या हस्ते काल दादरच्या श्री. शिवाजी मंदिर नाट्यगृह येथे सत्कार करण्यात आला लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्र काँग्रेस पक्षाने मोठा विजय मिळवला असून यात प्रदेश काँग्रेसच्या विविध सेल व विभागाचे कार्य महत्त्वाचे ठरले आहे या सर्वांनी राज्यातील गावागावात जाऊन काँग्रेसचा विचार पोहोचवणारे चे काम केले तसेच काँग्रेसच्या पाच न्याय आणि २५ गॅरंटीचे न्याय पत्र घरोघरी पोहोचवण्याचे काम केले आहे लोकसभेच्या प्रचारासाठी माननीय प्रदेशाध्यक्ष नानासाहेब पटोले यांनी स्टार प्रचारक म्हणून सिद्धी कामथ यांची नियुक्ती केली होती. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात जाऊन घरोघरी प्रचार केला होता कॉर्नर सभा घेतल्या होत्या तसेच विविध सभांना उपस्थित राहिल्या होत्या...यासाठीच योगदान बघून नानासाहेब पटोले यांच्या हस्ते शिवाजी मंदिर दादर येथे



सत्कार आणि सन्मान करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे महाराष्ट्र प्रदेश चे प्रभारी रमेश चैनीथलाजी, एस. सी. एस. टी. ओबीसी अल्पसंख्यांक विभागाचे राष्ट्रीय समन्वयक के. राजू ,एस. सी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश लोटिया, अल्पसंख्यांक विभागाचे राज्याचे अध्यक्ष आमदार वजाहत मिर्झा , प्रदेश सरचिटणीस संघटन व प्रशासन श्री. प्रमोद मोरे, प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे , सेल व विभागाच्या कॉर्डिनेटर प्रज्ञा वाघमारे , प्रतिभा शिंदे आधी मान्यवर उपस्थित होते.




# संत मुताबाई पालखीतील वारकऱ्यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाकडून मोफत आरोग्य तपासणी

बीड : संत मुक्ताबाई यांची पालखीतील पायी दिंडी सोहळ्यातील समस्त वारकऱ्यांची शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष तर्फे व आरोग्य दूत बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने बीड येथील पाली गावाजळ मोफत आरोग्य तपासणी चे आयोजन करण्यात आले. आयोजक अजित देशमाने व शिव सेना वैद्यकीय बीड शहर टीम यांनी मिळून या पालखीतील वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर, मोफत औषधी वाटप, ही सेवा राबवण्यात आली. धर्मवीर प्रतिष्ठान चे संस्थापक अध्यक्ष आरोग्य दूत मा. बाजीराव दादा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाने दिंडीतील वारकऱ्यांसाठी आरोग्य तपासणीचे आयोजन केले होते. यावेळी उपस्थित शिवसेना वैद्यकीय जिल्हाप्रमुख महादेव मातकर, बीड शहर कक्ष प्रमुख अजीत देशमाने , आरोग्य सेवक, संकेत पवार, अरुण घुमरे, दिनकर शिंदे, आधी शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष चे पदाधिकारी दिंडीतील आरोग्य तपासणी करण्यासाठी जिल्हा रुग्णालय बीड येथील श्री संत मुक्ताई पालखी आरोग्य शिबिरा डॉ. रमेश गुंजाळ, डॉ. अश्विनी कदम, डॉक्टर स्नेहल गोसावी, आंधळे मॅडम राठोड,मॅडम, यांनी हजेरी लावली.

## अ.भा.वारकरी भजनी मंडळाच्या वतीने

# हजारो भाविकांच्या उपस्थितीत परळीत संत नामदेव महाराज पालखीचा नेत्रदीपक रिंगण सोहळा संपन्न

परळी । प्रतिनिधी

आषाढी एकादशीच्या निमित्याने नर्सी नामदेव येथून पंढरपूरसाठी निघालेल्या संत नामदेव महाराजांच्या पालखीचे तीर्थक्षेत्र परळी वैजनाथ नगरीत आज शुक्रवार दिनांक ५ जुलै रोजी आगमन रिंगणत ४ वाजता झाले. टाळ, मृदंगाच्या निनादात पालखी मुख्य मार्गाने मार्गक्रमण करीत असताना मंगलमयी वातावरणाने परिसर भारून गेला होता. तर पालखीचा रिंगण सोहळा नेत्रदीपक ठरला.अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकार्यांच्या वतीने हा पालखी सोहळयाने भव्य दिव्य डोळयांचे पारणे फेडणारा रिंगण सोहळा परळीकरांनी पाहिला.

संत नामदेवांच्या जन्मस्थळापासून निघालेल्या पालखीचे पंढरपूरपर्यंत जाण्यासाठी एकूण २२ टप्पे होतात. यातील एक टप्पा हा पंचम ज्योतिर्लिंग परळी वैजनाथ येथे आहे. परळी वैजनाथ नगरीत दुपारी पालखी दाखल झाली होती. अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकार्यांच्या वतीने पालखीचे मोठ्या उत्साहात स्वागत करण्यात आले. ठिकठिकाणी महिलांनी पूजा करून पालखीचे दर्शन घेतले. विविध मान्यवरांनीही पालखीच्या स्वागतासाठी हजेरी लावत दर्शन घेतले. हाती भगवी पताका घेवून अगदी शिस्तीत जाणारे वारकरी, टाळ -मृदंगाचा गजर यामुळे भक्तीमय वातावरण झाले होते.

त्यानंतर नाथरोडवरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जत्रा मैदानावर पालखी पोहोचली. तेथे वारकर्यांनी भजने गात सर्वांचीच मने जिंकली. तर रिंगणामध्ये मानाचा असलेला संत नामदेव महाराज यांचा अश्व धावल्यानंतर इतर अश्व धावले. तर घोडेस्वारांनी यावेळी विविध कवायती सादर केल्या. काळजाचा ठोका चुकविणार्या या कवायती टिपण्यासाठी अनेकांचे कॅमेरे सरसावले होते. या कार्यक्रमास अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.रामेश्वर महाराज कोकाटे व त्यांच्या सहकार्यांनी व नगर परिषद, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कर्मचार्यांनी अथक परिश्रम घेतले.

एकंदरीत ज्ञानोबा माऊलीच्या जयघोषाने परळी वैजनाथ नगरी दुमदुमली होती. पालखीचे स्वागत करण्यासाठी विविध राजकीय, सामाजिक धार्मिक व शैक्षणिक क्षेत्रातील सदस्य, पदाधिकारी मंडळी तसेच परळी शहर व पंचक्रोशीतील भाविक भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाली होती.

उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने 'पांडुरंगाच्या द्वारी; आरोग्याची

### भव्य दिव्य रिंगण सोहळयाने भाविकांच्या डोळयाचे पारणे फेडले



वारी''पांडुरंगाच्या द्वारी; आरोग्याची वारी' या संकल्पनेतून परळी उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने वैद्यकीय अधीक्षक अरुण गुट्टे यांच्या सौजन्याने व अ.भा.वारकरी भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष ह भ प श्री रामेश्वर महाराज कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा लाभ सुमारे १५०० वारकऱ्यांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. यावेळी संत श्रेष्ठ श्री नामदेव महाराज यांच्या पालखीतील सर्व वारकऱ्यांना उपजिल्हा रुग्णालयाच्या वतीने मोफत औषधे देण्यात आली.अखिल भारतीय वारकरी भजनी मंडळ महिला मंडळातील सर्व पदाधिकाऱ्यांकडून दिंडीतील वारकरी महिलांचे ही स्वागत करण्यात आले रिंगण सोहळ्यास विविध महिला भजनी मंडळानी व कन्हैया अध्यात्मिक वारकरी संस्थेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहुन रिंगण सोहळ्यात सहभाग घेतल्यामुळे रिंगण सोहळा नेत्रदिप झाला. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने वारकऱ्यांना लिंबू सरबत चे वाटप करण्यात आले. सर्वांचे स्वागत तालुकाध्यक्ष विश्वांभर महाराज उखळीकर व आशोक महाराज कराळे यांनी केले तर आभार जिल्हाध्यक्षा सौ.राधिकाताई जायभाये व जिल्हा सचिव सौ.चेतनाताई गौरशेटे यांनी आभार मानले.

# पॉर्न फिल्म दाखवत पतीनेच केला अनैसर्गिक अत्याचार !

## जि.प. शिक्षक असलेल्या सासऱ्याकडून सुनेसोबत लगट करण्याचा प्रयत्न

**केज प्रतिनिधी- केज तालुक्यातील डोका येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक विष्णु मुरलीधर घोडके यांनी आपल्या सुनेसोबतच लगट करण्याचा प्रयत्न केला. तर ही घटना पतीला सांगितल्यानंतर पतीने बेदम मारहाण करत पॉर्न फिल्म दाखवत अनैसर्गीक अत्याचार केल्याची संताप जनक घटना घडली आहे. या घटनेची सविस्तर फिर्याद सदर**

तरुणीने पोलीस ठाण्यात दिली असून नवरा, सासरा सासूसह १० जणाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान गुन्हा दाखल होताच सर्वच आरोपी फरार झाले असल्याचे समजते.याबाबत अधिक माहिती अशी की, केज तालुक्यातील डोका येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले शिक्षक विष्णु मुरलीधर घोडके यांनी आपला मुलगा अमोल विष्णु घोडके याचा दि. १२-१०-२०१८ रोजी कडा मुली सोबत कोर्ट मॅरेज लग्न झाले साखरपुडा व रिसेप्शनचा खर्च मुलीच्या वडिलांनी केला. मात्र तरीही लग्नात १० तोळे सोने लग्नात मानपान झाला नाही म्हणुन दोन तीन दिवसातच पती अमोल घोडके, सासरे विष्णू घोडके, सासु यांनी त्रास देण्यास सुरुवात केली. व सतत पैशाची मागणी करु लागले. व पैसे न दिल्यास म ारहाण करू लागले. यामुळे मुलीच्या

पॉर्न फिल्म दाखवत... वडिलांनी सासरच्या मंडळीची समजूत घातली परंतु घोडके कुटुंबियांची हाव सुटली नाही. त्यामुळे मुलीच्या वडिलांनी त्रास कमी होईल म्हणून मुलीच्या वडिलांनी आपल्या मुलीला त्रास होऊ नये म्हणुन ४ लाख रुपये स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा कडा या बँकेचा चेक नंबर ३७३४०९ त्यांच्या खात्यावर जमा केला मात्र तेवढ्यावरच त्यांचे समाधान झाले नाही. पुन्हा काही दिवसानी पैशाची मागणी करू लागले. व परत त्रास देण्यास सुरूवात केली. मग वेळोवेळी पैसे घेवु लागले दि. १३-२-२०२२ रोजी माझा वाढदिवस होता त्या दिवशी सासु सासरे दीर जाऊ नणंद नणंदेचे पती चुलत सासरे चुलत सासु हे सर्व जनानी कायम हिनवत होते शिवीगाळ व मारहान केली त्यामुळे मी किचन मध्ये रडत बसली आसताना सासरे विष्णू घोडके पाणी पिण्याच्या बहाण्याने किचन मध्ये आले. त्यावेळी ते दारु पिलेले होते. त्यांनी माझा हात धरला व माझ्याशी लगट करण्याचा प्रयत्न करू लागला. त्याचवेळी मी तेथून निघून माझ्या बेडरूममध्ये निघून गेले. दुसरे दिवशी घडलेला सर्व प्रकार पतीला सांगितला. त्यावेळी पतीने माझ्या वडिलांवर आळ घेतेस का आणि बदनामी करतेस का? असे म्हणून मलाच लाथा बुक्याने मारहान केली व ओढत घेऊन जाऊन त्यांने कुरतेने माझ्याशी शारीरीक संबंध ठेवले व पोर्न फिल्म दाखवुन त्याप्रमाणे माझ्याशी अनैसर्गीक संभोग केला. असे प्रकार अनेक वेळा घडत असल्याने व असे विविध प्रकारे मला शारीरिक व मानसिक त्रास देऊन सतत पैशांची मागणी करु लागले. त्यामुळे या सर्व गोष्टी सहन न झाल्यामुळे मी दि.२५-६-२०२४ रोजी मी पुणे येथील कोंढवा पोलीस स्टेशन कोंढवा जि. पुणे शहर येथे पती, सासु, सासरा व शारीरिक व मानसिक त्रास देणाऱ्या इतर इसमाविरुद्ध फिर्याद दिली आहे. यामध्ये पती अमोल विष्णु घोडके, सासरा विष्णु मुरलीधर घोडके, सासु मंजुषा विष्णु घोडके, दिर अक्षय विष्णु घोडके, जाऊ वैशाली अक्षय घोडके, नणंद आश्विनी रामकृष्ण फुलझडे, नणंदचा पती रामकृष्ण विश्वनाथ फुलझडे, चुलत सासरे द्रोणाचार्य मुरलीधर घोडके, चुलत सासु विजयमाला द्रोणाचार्य घोडके, व चुलत सासरा राम मुरलीधर घोडके यांच्या विरुद्ध तक्रार दिली आहे. पिडितेच्या फिर्यादीवरून कोंढवा ता.जि.पुणे येथे विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान यातील सर्व आरोपी फरार असल्याचे समजते.

# शेतकऱ्यांनी स्वयंपूर्ण कुटुंब संकल्पनेचा अवलंब करावा - डॉ. बाबासाहेब ठोंबरे

केज । प्रतिनिधी

संस्कृतित कृषिचे अनन्यसाधारण म हत्त्व व योगदान असून दिवसेंदिवस शेती व्यवसायास प्रतिकूल होत जाणाऱ्या नैसर्गिक परिस्थितीत शेतकऱ्यांनी हवामान बदलास अनुकूल पिक पद्धतीचा अवलंब करावा. कृषि, पशुधन व मानव हे एकमेकांस पूरक निसर्गचक्र असून ते सकारात्मक दिशेने गतिमान करणे आवश्यक आहे. असे उद्गार कृषि महाविद्यालय लातूर व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्र महाविद्यालय लातूरचे अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी काढले. ते कै. भानुदासराव बाबुराव करपे यांच्या पाचवे पुण्यस्मरण दिनानिमित्त बुधवार, दि.०३ जुलै रोजी आयोजित केलेल्या भव्य शेतकरी मेळाव्यात अध्यक्ष म्हणून बोलत होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून गटशेतीचे प्रणेते तथा केशर आंबा लागवड व निर्यात अभ्यासक भगवानराव कापसे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून महाकेशरचे संस्थापक अध्यक्ष सुशिल बलदवा व माजी



सहाय्यक वनसंरक्षक शिवाजी गिरी, डॉ. शिवाजी मस्के, अच्युतराव गंगणे, ॲड. विश्वनाथ चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. ठोंबरे पुढे बोलताना म्हणाले की, गांव खेड्यामध्ये शेतकऱ्यांनी स्वयंपूर्ण कुटुंब या नविन संकल्पनेचा अवलंब करून स्वावलंबी बनावे. भगवानराव कापसे यांनी शेतकऱ्यांना केलेल्या मार्गदर्शनात हवामानानुसार शेतकऱ्यांनी फळे, भाजीपाला व नगदी पिके उत्पादित करावीत. अतिघन केशर आंबा लागवड करून दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आंब्याचे उत्पादन घेऊन निर्यातक्षमता वृद्धिंगत करावी व आपले निव्वळ उत्पन्न वाढवावे. शेतकऱ्यांना गट शेतीचा प्रयोग करणे क्रमप्राप्त असून त्यामुळे लागवडीचा खर्च कमी होण्यास मदत होईल व नफा वाढेल असेही डॉ. कापसे यांनीप्रतिपादन केले. माजी सहाय्यक वनसंरक्षक शिवाजी गिरी यांनी वन्य प्राण्यांपासून पिकाचे कसे संरक्षण करावे याबाबत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. दिलीप करपे यांनी केले तर आभार अभियंता प्रकाश करपे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी चंद्रकांत करपे, राजाभाऊ करपे, विश्वनाथ चव्हाण, दीपक शिनगारे, नरहरी करपे, बाबुराव खोडसे, जनक करपे, शिवाजी करपे, शहाजी करपे, ॲड. पी. जी. शिंदे आदींनी परिश्रम घेतले. शेतकरी मेळाव्यास पंचक्रोशीतील शेतकरी, पशुपालक व तरूण बहुसंख्येने उपस्थित होते.

# आदिशक्ती संत श्री मुक्ताबाई च्या पालखी सोहळ्यात समर्थांची समर्थवाणी जयदत्तजी क्षीरसागरांच्या शुभहस्ते प्रकाशन

बीड । प्रतिनिधी

येथील सुप्रसिद्ध निवेदक सुरेश साळुंकेंनी मराठा तितुका मिळवावा महाराष्ट्र धर्म वाढवावा सांगत स्वराज्य हित सांगणाऱ्या श्री समर्थ रामदास स्वामींच्या जगप्रसिद्ध दोनशे पाच मनाच्या श्लोकावर निरूपण करणारे पुस्तक लिहिले आहे.त्याचा प्रकाशन सोहळा इहपर लोकी सुखी। शुद्ध ज्ञान ज्याचे मुखी।।

मिथ्या कल्पना मागे सारा। ताटी उघडा ज्ञानेश्वरा म्हणत मोठ्या आर्ततेने ज्ञानेश्वर माऊलींना हाक देणाऱ्या संत श्री आदिशक्ती मुक्ताबाईच्या पालखी सोहळ्यात महाराष्ट्र राज्याचे माजीमंत्री जयदत्तजी क्षीरसागरसाहेबांच्या शुभहस्ते आदिशक्ती संत श्री मुक्ताबाईंच्या पालखी सोहळ्याचे प्रमुख हरि भक्त परायण परमपूज्य गुणनिधान श्री हरणे महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रकाशन सोहळा संपन्न झाला.प्रकाशन सोहळ्याच्या अनुषंगाने जयदत्तजी क्षीरसागर म्हणाले समर्थांची समर्थवाणी कालातीत निरंतर समर्थ आहे. त्या अनुषंगाने सुरेशने पुस्तकास दिलेले शीर्षक हे निश्चितच अर्थपूर्ण आहे... अभ्यास पुर्ण आहे.दै.पार्श्वभूमिमधुन निरंतर चालवलेल्या सदर हे पुस्तक रुपाने समाजत येते हि आनंदाची गोष्ट आहे.निवेदन क्षेत्रामध्ये स्वतःची ओघवती शैली निर्माण करून यशस्वी झालेला



सुरेशचा अध्यात्मिक क्षेत्रामध्ये पुस्तक लिखाणाचा पर्यंत यशस्वी होईल कारण सुरेशची सजगता हि सृजनशील आहे.सोशल मिडियातुन सुरेशचे प्रसिद्ध होणारे शिवपुष्प आणि चित्रोळी हे सदर सुद्धा वाचनीय असतात. तर ह.भ.प. हरणे महाराज म्हणाले मनाच्या श्लोकाची आज समाजाला नितांत गरज आहे आणि त्याच वेळी समर्थांची समर्थवाणी पुस्तक प्रकाशित होते आहे हि मोठ्या आनंदाची गोष्ट आहे.

यावेळी पालखी सोहळ्यामध्ये दोनशे पाच वारकऱ्यांना समर्थांची समर्थ वाणीचे वितरण इच्छापुर्ति गणेश भक्तांच्या शुभ हस्ते वाटले.जणांना पुस्तक प्रकाशन सोहळा यशस्वी करण्यासाठी सुरेश साळुंकेंच्या सर्व मित्र परिवाराने परिश्रम घेतले.पुस्तक प्रकाशना प्रसंगी सर्व पत्रकार बांधवानी मित्र परिवाराने शुभेच्छा दिल्या.

# साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०४ व्या जयंतीची कार्यकारणी जाहीर...

बीड /प्रतिनिधी

बलभीम नगर पेठ बीड येथे, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम ज्यामध्ये सर्व रोग निदान शिबिर, महिलांना साडी वाटप, रक्तदान, गुणवंत विद्यार्थी यांचा सत्कार , अन्नदान कार्यक्रम, वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, अशा विविध उपक्रमाने साजरी करणार आहे असे जयंती उत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष विनोद दादा हातागळे यांनी म्हटले आहे. त्याच अनुषंगाने आज बलभीम नगर येथे जयंती उत्सव समितीची कार्यकारिणी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये जाहीर करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी डॉ.लक्ष्मण जाधव हे होते तर उपस्थितामध्ये सादिक भाई, रुस्तुम भाऊ बेद्रे,विजेंद्रसिंग डूलगच, चेअरमन विजय भाऊ जाधव, सीताताई भोसले,नरेश पीव्हाळ, अशोक उर्फ मायकल वाघमारे, आदी मान्यवर लाभले.

जयंतीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते शेख खदीर भाई यांची निवड झाली तर उपाध्यक्षपदी युवा नेते भैय्यासाहेब मस्के, सचिव पदी कचरू वाघमारे यांची निवड करण्यात आली. सहसचिव पदी रामभाऊ वाघमारे, कोषाध्यक्षपदी गणेश हातागळे, व्यवस्थापक पदी अभिजीत गायकवाड तर सदस्य पदी विशाल धुतावळे, करण लांडगे, विनोद कोकाटे, अनिल डोंगरे, सुनील माने, अविनाश हातागळे, रोहन घुले, अमित चांदणे, मंथन राऊत, रामेश्वर शिरसागर, सनी हजारे, आदित्य पवार, अभिषेक जाधव आदी

याप्रसंगी माजी अध्यक्ष अनिल चांदणे, राहुल चांदणे,भारत पिवळ,विशाल कांबळे, किरण शिंदे, केके कांबळे, सुरज धारू, पिंटू ओहाळ, सुरेश गायकवाड, अजय मुंडे, अमोल जाधव, अण्णा लोंढे, बाबु



इनकर, बाबू जाधव, साहिल पिवळ, जयदत्त जाधव, किरण जोगदंड, राहुल पवळे, संतोष मस्के, संजय उबाळे, सुरेश पिवळ, आनंद शिंदे, लखन पिवळ, शिव पिवळ,अमोल धनवे, राहुल वावळे, शरद विटकर, बाबासाहेब उपळकर आधी उपस्थित होते. आभार प्रदर्शन जयंती उत्सव समिती स्वागत अध्यक्ष स्वप्नील भैया हातागळे यांनी मानले.

# मनसेचे जागरण गोंधळ आंदोलन!

## कार्यकारी अभियंता सगर यांच्या भ्रष्टाचाराचे वाचणार पाढे!

बीड /प्रतिनिधी

महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणेच्या बीड येथील मुख्य कार्यालयासमोर दिनांक १० जुलै रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने जागरण गोंधळ आंदोलन करण्यात येणार आहे. बीड जिल्ह्यातील मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत झालेल्या कामांची चौकशी करत मे राजकमल कन्स्ट्रक्शन कंपनीवर गुन्हा नोंद व कन्स्ट्रक्शन कंपनी काळी यादीत टाकण्याची मागणी मनसेच्या वतीने करण्यात आलेली आहे. याची दखल बीड व छत्रपती संभाजी नगर येथील विभागीय कार्यालयाने घेतली नसल्याने कार्यकारी अभियंता सगर यांच्या भ्रष्टाचारा विरोधात जागरण गोंधळ घालण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना तथा पंतप्रधान ग्राम सडक योजनेच्या कामात बीड मध्ये बोगसगिरी करण्यात आली आहे. कोट्यावधी रुपयांचे टेंडर असताना अंदाजपत्रका नुसार कामे न करता बिल उचलण्यात आलेली आहे. या विरोधात मागील वर्षापासून मनसेने मे राजकमल कन्स्ट्रक्शन यांची विविध स्तरावर तक्रार करण्यात आलेली होती .याची दखल बीड येथील महाराष्ट्र ग्रामीण विकास यंत्रणेचे कार्यकारी अभियंता सगर हे घेत नसून वरिष्ठ अधिकारीही सगर यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास योजने मधील झालेली कामे अत्यंत



बोगस गिरीने करण्यात आलेली आहे तीन महिन्यातच काही ठिकाणी रस्ते उखडलेले आहे जागोजागी खड्डे पडले आहेत टेंडर देताना दहा वर्षाचे मेंटनस संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीला बंधनकारक आहे .मात्र मेंटेनन्स ची कामेही होत नसल्याने ग्रामीण भागातील दळणवळणीचा मुख्य स्त्रोत असणारा रस्ता भ्रष्टाचाराच्या विळख्यात सापडला आहे. सगर यांना कोणतीही गंभीरता नसल्याने संबंधित कन्स्ट्रक्शन कंपनीचे बिले आता करण्यात सगर हे कोणतीही कामाची शहानिशा करताना दिसत नाहीत .महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास यंत्रणा बीड जिल्ह्यात पूर्णपणे भ्रष्टाचाराने बुडालेली आहे .या विरोधात दिनांक १० जुलै रोजी बीड येथील मुख्य कार्यालया समोर सगर यांच्या कारणामांचे पाढे जागरण गोंधळ च्या माध्यमातून वाचण्यात येणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांनी व सामान्य नागरिकांनी सहभाग नोंदवण्याचे आवाहन महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे यांनी केले आहे.

# अनिल जगताप यांना आमदार करण्यासाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे-सुनील सुरवसे

बीड /प्रतिनिधी

बीड विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमी पाहता अनिल जगताप हा चेहरा जनतेच्या नजरेत बसला आहे त्याचे कारण असे आहे की मराठा आरक्षणाला पाठिंबा देणे, सामाजिक कार्यात सहभागी होणे अनिल जगताप यांच्या जमेच्या बाजू अनिल जगताप यांनी आतापर्यंत अनेकदा अनाथ, आत्महत्याग्रस्त, शेतकरी, कलावंत, गोर गरीब मुले, एखाद्या आडकलेल्या विद्यार्थ्यांचे ॲडमिशन यासाठी तळागाळात जाऊन तात्काळ मदत केली आहे तसेच जनतेसाठी रात्री अपरात्री कोणत्याही वेळी ते मदतीला धावून गेल्याचे अनेकांनी पाहिले आहे मुस्लिम समाजात देखील त्यांची सामाजिक कार्यामुळे क्रिकेटच्या स्पर्धेला पाठबळ दिल्यामुळे एक वेगळीच क्रेझ आहे. अनिल जगताप यांनी मराठा क्रांती मोर्चा ला

तसेच मराठा आरक्षणाला पाठिंबा दिला होता याचा फायदा




देखील विधानसभेत भेटू शकतो म्हणून बिडकाराने ठरविले आहे अनिल जगताप यांचा चेहरा समोर ठेवून विधानसभा निवडणूक ही अनिल जगताप यांनीच जिंकली पाहिजे यासाठी विधानसभेतील सर्व मतदार यांनी व शिवसैनिकांनी आपापले प्रभाग, आपापल्या वाड्या, वस्त्या, गाव , सर्कल या ठिकाणी शिवसैनिक सज्ज करावे यांना विधानसभेवर निवडून आणण्याचे काम जिम्मेदारीने करावे असे आवाहन शिवसेनेचे जिल्हा संघटक सुनील सुरवसे यांनी पत्रकात नमूद केले.

# मछलीपट्टनम-बिदर व हैद्राबाद-बिदर रेल्वेगाड्या परळी वैजनाथ पर्यंत विस्तारित करा - रेल विकास समिती.

परळी वैजनाथ, (प्रतिनिधि) दक्षिण मध्य रेल्वे झोन अंतर्गत सिकंदराबादचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक भरतेश कुमार जैन व इतर अधिकारी बुधवारी येथील रेल्वे स्थानकाच्या निरिक्षणासाठी आले होते

यावेळी ज्येष्ठ समुपदेशक तथा महाराष्ट्र प्रदेश भाजपा रेल्वे प्रवाशी प्रकोष्ठ चे बीड जिल्हा संयोजक गणपतअप्पा सौंदळे गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन त्यांना रेल्वे विषयक मागण्यांचे निवेदन सादर केले. याप्रसंगी त्यांच्या सोबत अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक एम गोपालजी, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक सुरेशजी रेड्डी, विभागीय वाणिज्य व्यवस्थापक बालाजी किरण , वरिष्ठ विभागीय अभियंता वाय शशांक , रेल्वे सुरक्षा बल चे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर मलकुनाईक, परळी रेल्वे स्थानक अधीक्षक तुलसीराम मीना, उपअधीक्षक संतोष सिरसाठ, वाणिज्य निरीक्षक बिरेंद्र कुमार, पीबल्युआय राजीव रंजन इत्यादि अधिकारी उपस्थित होते. प्रारंभी त्यांचे स्वागत करून औरंगाबाद-हैद्राबाद रेल्वे गुंटूर पर्यन्त विस्तारित केल्याबद्दल रेल्वे प्रशासनाचे आभार मानले. त्याच धर्तीवर बिदर रेल्वे स्थानकात अधिक काळ खोळंबून रहात असणाऱ्या मछलीपट्टनम-बिदर, हैद्राबाद-बिदर, यशवंतपूर-बिदर एक्स्प्रेस या रेल्वेगाड्यांना परळी वैजनाथ टर्मिनस पर्यंत विस्तारित कराव्यात कशी आग्रही मागणी निवेदनात करण्यात आली आहे. त्याशिवाय नांदेड-पनवेल एक्स्प्रेसला आणखी अधिक जादा स्लीपर कोचेस आणि जनरल बोगीज वाढवाव्यात, येथील आरक्षण कक्षाची कामाची वेळ वाढवून सकाळी आठ ते रात्री आठ म्हणजे सलग १२ तास करावी, परळी वैजनाथ टर्मिनस रेल्वे स्थानकात पीट लाईन ची सोय करावी, घाटनांदूर ते परळी वैजनाथ दरम्यान मौजे अंबलटेक येथे एक नवीन रेल्वे स्थानक रेल्वे क्रॉसिंगसाठी बांधण्यात यावे, इत्यादि मागण्यांचाही सदर निवेदनात समावेश आहे

या शिष्टमंडळात सर्वश्री समुपदेशक गणपतअप्पा सौंदळे गुरूजी, माजी रेल डी,आर,यु,सी,सी,मेंबर आत्मलिंग शेटे,



संपादक बालकिशन सोनी, व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ज्ञानोबा माऊली फड, उपाध्यक्ष नंदकिशोर बियाणी, संस्कार विद्यालयाचे अध्यक्ष कैलास तांदळे,ज्येष्ठ पत्रकार महादेव गित्ते पाटील, भाजपा रेल्वे प्रकोष्ठचे स्थानक प्रमुख आश्विन मोगरकर, मानद सदस्य दीपक वांजरखेडे, सुनील जठार,गोविंद चांडक,हबीबभाई शेख, चिंतामणी खंडागळे, विकासजी हालगे,राजेशजी कौलवार,सूर्यप्रकाश तुसाम, सचिन पोखरकर, गोपाल अघाव, श्रीराम लांडगे, राहूल घोबाळे, भगवान राठोड, राहूल रोडे, विजय जोशी, प्रशांत सौंदळे, दत्तात्रय लहाने,इत्यादि मान्यवर शिष्टमंडळात सहभागी झाले होते.


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT